श्री.दीपक कपूर,भा.प्र.से. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या परदेश दौऱ्यास मान्यतेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
शासन निर्णय क्र. झोपुयो-१२०३/प्र.क्र.३३/२०१९/झोपसु-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २२ मार्च, २०१९

<u>**संदर्भ :**</u>-१) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांचे पत्र क्र.मु.का.अ./झोपुप्रा/३०८२/२०१९ दि.०६.०२.२०१९.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांचे पत्र क्र.मु.का.अ./झोपुप्रा/३२६०/२०१९ दि.२५.०२.२०१९.
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परदौ-१४१४/प्र.क्र.४६/११ दि.२९ डिसेंबर,२०१४
४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परदौ-१४१६/प्र.क्र.११/११ दि.२ जून,२०१६
५) शासन पत्र झोपुयो-१२०३/प्र.क्र.३३/२०१९/झोपसु-१, दि.१३.०३.२०१९.

<u>**प्रस्तावना,**</u>

वॉशिंग्टन DC, अमेरिका येथे आयोजित "२०th Annual World Bank Conference on Land and Poverty" या विषयावर दि.२५ मार्च २०१९ ते २९ मार्च, २०१९ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या परिषदेमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, महाराष्ट्र शासनाच्या वतीने "Egovernance initiatives of Slum Rehabilitation Authority, Mumbai" या विषयावरील सादरीकरणासाठी जागतिक बँकेने श्री.दीपक कपूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना आमंत्रण दिले आहे. या अनुषंगाने परदेश दौऱ्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या संदर्भ क्र.१ व २ च्या पत्रांन्वये प्राप्त झाला असून या प्रयोजनासाठी होणारा खर्च झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून करण्यात येणार आहे.

२. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या प्रस्तावास अनुसरुन संदर्भिय शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि. २९ डिसेंबर २०१४ व दि.२ जून, २०१६ मधील तरतुदीनुसार प्रस्तावास विभागाचे प्रभारी मंत्री यांची मान्यता घेण्यात आली. तसेच विहित कार्यपध्दतीनुसार प्रस्तावास सामान्य प्रशासन विभागामार्फत शासन मान्यता घेण्यात आली.

३. जागतिक बँकच्या दि.०६.०२.२०१९ च्या आमंत्रणास अनुसरुन श्री.दीपक कपूर, भाप्रसे, यांच्या उपरोक्त दौऱ्याचा प्रस्ताव विहित नमुन्यात (Online FC-२ Form, EPC Form) संदर्भ क्र.५ च्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या विविध मंत्रालयाकडे पाठविण्यात आला होता. त्यास अनुसरुन केंद्र

शासनाच्या Ministry of External Affairs, New Delhi यांचेकडून EPC १३०३१९४५७२० US दिनांक २०.०३.२०१९ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

शासन निर्णय :-

श्री.दीपक कपूर, भाप्रसे, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना दि.२४ मार्च २०१९ ते ०२ एप्रिल, २०१९ (प्रवासाच्या कालावधीसह) या कालावधी मधील वॉशिंग्टन DC, अमेरिका येथे आयोजित "२०th Annual World Bank Conference on Land and Poverty" या विषयावरील सादरीकरणासाठी उपस्थित राहण्याकरीता परदेश दौऱ्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर विदेश दौऱ्याचा खर्च झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या निधीतून करण्यात येणार आहे.

श्री दीपक कपूर, भा.प्र.से., मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई, यांनी त्यांच्या विदेश दौऱ्यासंबधिचा विस्तृत अहवाल गृहनिर्माण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागास सादर करावा.

उपरोक्त कालावधीत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण या पदाचा कार्यभार श्री.मिलिंद म्हैसकर, उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांच्याकडे सोपविण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.intranet.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३२२१४४०५६७१०९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kishor Govind Pathade

Digitally signed by Kishor Govind Pathade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=726d2037f6079adea28b13974a86a161d6bd207d40c09081cda096a0b4bd82a5, serialNumber=57cba7a0612a9f66d82de41da002a8575e53c67104ae2c0b0313b15b530b7544, cn=Kishor Govind Pathade
Date: 2019.03.22 14:49:25 +05'30'

(कि. गो. पठाडे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
२. मा.मंत्री (गृहनिर्माण)/ मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. श्री. दीपक कपूर, भा.प्र.से., मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व) मुंबई-४०००५१
६. श्री.मिलिंद म्हैसकर, उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
७. निवड नस्ती/ झोपसु-१